# SUCCESS KEY TEST SERIES


**प्रथम सत्र परीक्षा (नमूना प्रश्नपत्रिका)**

| | | |
|---|---|---|
| **Std: VIII (E.M)** | **Subject: Marathi** | **Time: 2Hrs** |
| **Date :** | **Chapter 1.2 to 1.7** | **Max Marks: 50** |


**विभाग १ : गद्य**

**Q.1 (क) खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा:** **(8)**

1. अ. वेब पूर्ण करा : (1)




**आ. वेब पूर्ण करा** **(1)**




(सर्वजण मेंदूराजे यांच्याकडे जातात. त्यानंतर मेंदूराजे तातडीने सभा घेतात.)

सर्वजण : मेंदूराजेसाहेबांचा जयजय कार असो!

मेंदूराजे : बसा मंडळी. पोटोबा प्रधान आले, की नाही अजून!

पोटोबा : मी केव्हाच हजर आहे महाराज.

मेंदूराजे : पोटोबा, या सर्व मंडळींची तुमच्या बद्दल तक्रार आहे , की तुम्ही अजिबात काम करत नाही. नुसतं खाता आणि दुसऱ्यांवर गुरगुरता.

पोटोबा : महाराज बोलताना जरा बेअदबी होतेय , कसूर माफ असावी ; पण मी काम करत नाही हे म्हणणं साफ खोटं आहे. हो , अधूनमधून मी गुरगुरतो ; पण ते यांच्यावर नव्हे. ती माझी सवय आहे. त्याशिवाय शरीराचं राज्य सुरळीत कसं चालणार ? आता हेच उदाहरण घ्या ना. या सर्वांनी संप पुकारला. मी गप्प बसलो ; पण याचा परिणाम त्यांनाचा भोगावा लागला. जीवनरस मिळाला नाही म्हणून त्यांचे चेहरे बघा कसे सुकून गेलेत.

मेंदूराजे : नयनकुमार, पटलं ना सर्वांना! शिवाय असं पहा , आपण सारेच एकमेकांवर अवलंबून आहोत. आपल्या देशाचं राज्य सुरळीत कसं चालणार? आपल्या देशाचं राज्य चालतं ते सर्वांच्या एकतेमुळे. पाय चालतात ते रस्ता डोळ्यांनी दिसतो म्हणून. सर्वांची कामे होतात ती पोटोबामुळे. आपणाला जीवनरस मिळतो म्हणून. त्याने अन्न खाल्ले नाही तर काय हाल होतात ते आता तुम्हांला समजले असेलच. आपण सारेच या शरीररूपी राज्याचे सेवक आहोत. आपले हे राज्य सुरक्षित राहण्यासाठी आपण सर्वांनी एक
व्हायलाच हवे. खरे ना?

सर्वजण : होय महाराज , पोटोबा, आम्हांला क्षमा करा. आता पुन्हा नाही आम्ही तुमच्याविषयी कुरकुर करणार. आपण सारेच या राज्याचे सेवक. आपण सारे एक! आपण सारे एक!!

2. पाठातील योग्य पर्याय ओळखून वाक्य पूर्ण लिहा. (२)

अ. बसा मंडळी, पोटोबा ______ आले कि नाही अजून!

१. मंत्री  २. सेनापती  ३. प्रधान ४. सेवक

आ. _______ मिळाला नाही म्हणून त्यांचे चेहरे बघा कसे सुकून गेले.

१. सरबत  २. जीवनरस  ३. दूध  ४. अन्न

इ. आपल्या देशाचं राज्य चालत ते सर्वांच्या ________

१. मैत्रीमुळे  २. कष्टामुळे  ३. विचारामुळे  ४. एकतेमुळे

ई. आपण सारे या ______ राज्याचे सेवक!

१. शरीररूपी  २. संपूर्ण  ३. सर्व  ४. देहरूपी

3. अ. वाक्प्रचारांचा अर्थ सांगा (1)

i. बेअदबी होणे  ii. कुरकुर करणे

आ. विरामचिन्हे ओळखून त्यांची नावे लिहा. (1)


i. बसा मंडळी. पोटोबा प्रधान आले, की नाही अजून!

ii. ती माझी सवय आहे. त्याशिवाय शरीराचं राज्य सुरळीत कसं चालणार?

4. "आपण सारेच या शरीररूपी राज्याचे सेवक आहोत. आपले हे राज्य सुरक्षित राहण्यासाठी आपण सर्वांनी एक व्हायलाच हवे." या वाक्याचा तुम्हाला समजलेला अर्थ लिहा. (2)

**(ख) खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा:** **(8)**

1. आकृतिबंध पूर्ण करा: 2




मुंबई प्रांतात रेल्वे असावी असा उठाव मुंबईला प्रथम सर जमशेटजी जिजीभाई आणि जगन्नाथ नाना शंकरशेट यांनी केला. मूळजी जेठा मोरारजी गोकुळदास , आदमजी पीरभाई, डेविड ससून वगैरे अनेक नामांकित नगरशेटजींचे अर्थात त्यांना पाठबळ होतेच. सन १८५३ मध्ये ग्रेट इंडियन पेनिनशुला रेल्वेचा पहिला छोटा फाटा मुंबई ते ठाणेपर्यंत एकेरी रस्त्याचा तयार झाला. लोखंडी रूळावरून इंग्रज आगीनगाडी चालवणार, ही कल्पनाच लोकांना मोठी अचंब्याची वाटली.

अखेर मुहूर्ताचा दिवस जाहीर झाला. दिनांक १८ एप्रिल सन १८५३ , सोमवार रोजी सायंकाळी ५ वाजता पहिली आगगाडी मुंबईहून निघाली. पाना-फुलांचे हार , तोरणे, निशाणे लावून १० मोठे खोलीवजा डबे शृंगारलेले. इंजिनावर अंग्रेजांचे मोठे निशाण फडकत आहे. डब्यांत गादीच्या खुर्च्या , कोच यांवर रेल्वेचे सगळे डायरेक्टर , सर जमशेटजी जीजीभाई , नाना शंकरशेट आणि अनेक इतर नगरशेट जामानिमा करून बसलेले. बरोबर पाच वाजता आगगाडीने कूऽक शिटीचा कर्णा फुंकून आपल्या भकभक, फकफक प्रवासाला सुरुवात केली.

मुंबई ते ठाणे दुतर्फा लाखांवर लोक कलियुगातला हा विंग्रेजी चमत्कार पाहायला आ वासून उभे होते. ना बैल, ना रेडा, ना घोडा आणि वाफेच्या जोरावर एक नाही , दोन नाही, दहा डब्यांची माळका खुशाल चालली आहे झुकझुक करत लोखंडी रूळांवरून! कमाल आहे बुवा या विंग्रेजांची! आता तर काय ? विस्तव आणि पाणी यांची सांगड घालून विंग्रेजांनी वाफेलाच गाडी ओढायला लावले

2. घटनाक्रम लिहा: 2

i. बरोबर पाच वाजता आगगाडीने कर्णा फुंकून भकभक, फकफक प्रवासाला सुरूवात केली.

ii. मुहूर्ताचा दिवस जाहीर करण्यात आला.

iii. रेल्वेचे सर्व डायरेक्टर, सर जमशेटजी जीजीभाई, नाना शंकरशेट व इतर नगरशेट जामानिमा करून बसले.

iv. पाना-फुलांचे हार, तोरणे, निशाणे लावून आगगाडीचे डबे सजवण्यात आले.

3. अ. खालील शब्दांचे पाठात आलेले समानार्थी शब्द लिहा: 1

i. दोन्ही ii. रांग

ब. खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा: i. अखेर ii. दुतर्फी 1

4. लोखंडी रूळावरून इंग्रज आगीनगाडी चालवाणर याचे आश्चर्य लोकांना वाटत होते याबद्दल तुमचे मत लिहा. 2

**विभाग २ : पद्य**

**Q.2 खालील पदयाच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा. (8)**

1. योग्य पर्याय निवडा. (2)

(अ) कलागुणांच्या क्षितिजावर प्रतिभेची पहाट उगवली, कारण _________

(१) सूर्योदय होऊन सकाळ झाली.

(२) नवे युग उजाडले.

(३) ज्ञानाचे तेज नव्या युगाच्या नभात पसरले.

(४) पक्ष्यांचा चिवचिवाट सुरू झाला.

(आ) कवीच्या मते 'मानवतेचे युग' म्हणजे- _________

(१) मानवांचे युग.

(२) नव्या विचारांचे युग.

(३) माणसाच्या प्रगतीचे युग.

(४) भेदाभेद नसलेले युग.

हे ज्ञानाचे तेज पसरले नव्या युगाच्या नभात
कला-गुणांच्या क्षितिजावरती ही प्रतिभेची प्रभात.
भव्य पटांगण, बाग मनोहर
फुला-पाखरांचे जग सुंदर
आपुलकीचा सुवास पसरे
मनामनांतून इथे निरंतर.
गुरुजनांची अमूल्य शिकवण या स्पर्धेच्या युगात,
कलागुणांच्या क्षितिजावरती ही प्रतिभेची प्रभात.

पायाभरणी अस्तित्वाची
प्रयोगशाळा व्यक्तित्वाची,
तन सुदृढ, मन विशाल होई
इथे रुजवणूक त्या तत्त्वांची
विचारधारा तीच वाहते नसानसांत, रगारगांत,
कलागुणांच्या क्षितिजावरती ही प्रतिभेची प्रभात.

नवीन स्वप्ने , नवीन आशा
ही प्रगतीची नवपरिभाषा,
परिश्रमाने, अभ्यासाने
उन्नत बनवू आपुल्या देशा.
मिटवून सारे भेद चला रे मानवतेच्या युगात
कलागुणांच्या क्षितिजावरती ही प्रतिभेची प्रभात.

2. खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा. (2)

(अ) कवीच्या मते व्यक्तितत्वाच्या प्रयोगशाळेत कोणते गुण रुजतील?

(आ) प्रगतीची नवपरिभाषा कोणती?

3. तुम्हांला कळलेली कवीची प्रगतीची नवपरिभाषा स्पष्ट करा. (2)

4. ‘मिटवून सारे भेद चला रे मानवतेच्या युगात’, या विधानातील भाव स्पष्ट करा. (2)

**विभाग ३ : व्याकरण**

**Q.3 (क) खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा:** **2**

**(i)** दिवा

**(ii)** मित्र

**(ख) खालील शब्दांचे अव्यय ओळखून लिहा.** **2**

**(i)** अबब

**(ii)** i. पोटोबाविरुद्ध ii. बापरे!

**(ग) अचूक शब्द ओळखा :** **2**

**(i)** क्षितिजावरती, क्षितीजावरती, क्षीतिजावरती, क्षितीजावारती

**(ii)** सुसंसकृत, सुसंस्कृत, सुसंस्क्रुत, सुसांस्कृत

**(घ) खालील शब्दांचे वचन बदला:** **2**

**(i)** वाट

**(ii)** ढाल

**(ङ) दिलेल्या वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा** **3**


**(i)** काळजात लख्ख होणे

**(ii)** आतुरतेने वाट पाहणे

**(iii)** पोटभर मार खाणे

**विभाग ४ : उपयोजित लेखन**

**Q.4 (i) खालील जाहिरात वाचा आणि एका विषयावर पत्रलेखन करा.** **5**




**(ii) खलील शब्दांच्या/मुद्दे आधारे कथा तयार करा:** **5**

सूर्य व वारा भांडण - श्रेष्ठ कोण ? ___ कोट घातलेला माणूस ____ कोट काढण्याची पैज ____ वारा जोरात वाहतो ____ माणूस कोट घट्ट लपेटतो ___ सूर्य तापतो ____ माणूस कोट काढतो _____ सूर्य जिंकतो.

**(iii) पुढील उतारा वाचून त्यावर पाच प्रश्न तयार करा:** **5**

आईने वासंतीला सर्व प्रकारच्या कामांची सवय लावली. तिने तिला स्वयंपाक करावयास शिकवला. त्या दोघी जात्यावर दळणही दळत असत.दळताना त्या सुंदर गाणी म्हणत! वासंतीची कविता तिच्या गाण्यांवर पोसली आहे. आज अपंग वासंती स्वतःचे काम स्वतः करतेच ,पण शिवाय घरातीलही ती सर्वकाहा करु शकते. याचे श्रेय ती आपल्या आईला देते. ‘शरीर थकले तरी मनाने थकू नये ’असे वासंतीची आई नेहमी म्हणे.ते तिच्या मनावर ठसले होते.म्हणूनच घरापासून दूर असलेल्या विद्यापीठात ती जाऊ शकते.तेथील जिने स्वतः चढून एम्.ए.च्या वर्गात जाऊन बसते.अडचणीवर मात करणे,जे नाही त्याबद्दल दुख न करत बसता मार्ग काढणे ,ह्यातच माणसाचे माणूसपण आहे ,दुखाने खचून जाण्यात नाही असेच वासंती समजते.

**-------- All the Best --------**